Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## Contemporary Issues&Challenges in Humanities

**SPECIAL ISSUE -224 (B)**

**March-2020**




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Santosh Kurhe**
**Coordinator**
Professor & Head of Department Pub.Admn.
Swatantraya Sainik Suryabhanji Pawar
College, Purna (Jn), Dist.Parbhani Maharashtra

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 31 | पर्यावरण व पर्यटनाचे बदलते स्वरूप प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण | 111 |
| 32 | भ्रष्टाचार आणि भारत डॉ. दाणे बी.एल | 115 |
| 33 | मानवी हक्क व सामाजिक न्याय (विशेष संदर्भ : — भारत) डॉ.बंजारा दिलीप लालुप्रसादजी | 118 |
| 34 | 'दहशतवाद: एक सामाजिक समस्या' प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | 122 |
| 35 | राजकीय पर्यावरण डॉ.सोमगोंडे एन.एस. | 128 |
| 36 | जागतिकीकरणात सामाजिक न्यायाचा वास्तवादी दृष्टिकोन. डॉ.मारोती घंटेवाड | 131 |
| 37 | सामाजिक न्याय आणि आजचे वास्तव डॉ. सविता शिवनाथ झुंजारे | 137 |
| 38 | WOMEN EMPOWERMENT Adv. Shalaka Parag Dhamdhere | 142 |
| 39 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे व उपाय प्रा. विनायक जाधव | 144 |
| 40 | महिला सक्षमीकरण : एक अभ्यास डॉ. वैशाली शेषराव पेरके | 148 |
| 41 | वैदिक धर्मातील तप साधना डॉ.मंजुश्री श्रीपाद नेव्हल | 152 |
| 42 | महिला सक्षमीकरण सीमा बाबुराव उप्पलवार | 157 |
| 43 | ई-ग्रंथालय : ग्रंथपालाची भुमिका डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 160 |
| 44 | मानवतेसमोरील सद्याची जागतिक आव्हाने प्रा.प्रमोद रामकृष्ण तायडे | 163 |
| 45 | महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्री-मुक्ती विषयक विचार एक चिकित्सक अभ्यास प्रा.डॉ. सुनिल चवळे | 172 |
| 46 | दुष्काळी परिस्थिती कारणे व उपाय प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर | 175 |
| 47 | महाविद्यालयीन ग्रंथालय सेवा आणि बदलते स्वरुप प्रा.कल्पना आबाराव सिडाम | 179 |
| 48 | महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाचा प्रशासकीय अभ्यास प्रा.डॉ.शिवाजी एस.जाधव | 182 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue 224(B)
ISSN : 2278-9308
March 2020

# 'दहशतवाद: एक सामाजिक समस्या'

प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड. (मराठवाडा) पिन कोड: ४३१७३६

**सारांश (aAbstract):**

भारतात लोकशाहीच्या आतापर्यंतच्या वाटचालीत कोणत्या प्रकारची हिंसा कोठे कोठे आणि किती बारंवार झाली आणि तिचा मुकाबला करण्यासाठी शासन संस्थेने किती नवनवे जहाल मार्ग अमलात आणले, किती नवनव्या आक्रमक सशस्त्र यंत्रणा उभ्या केल्या हे पाहायला लागलो तर काहीसे भीतीदायक चित्र पुढे येते. अशा सामुहिक हिंसेच्या घटनांचा नकाशा तयार करायचा म्हटले तर देशाच्या किती तरी भागांवर हिंसेचा काळा झेंडा फडकताना दिसेल. तूर्त या चर्चेतून आपण दुय्यम आणि हिशेबी हिंसा बाजूला ठेवू. दुय्यम हिंसा म्हणजे फार पूर्वनियोजित नसलेली, पण स्पर्धेच्या तीव्रतेमधून निर्माण होणारी तात्कालिक हिंसा.

**सूचनक शब्द (keyword):** हिंसा, गुन्हेगारी, दहशतवाद, सामाजिक समस्या, समुह हिंसा, संघटीत हिंसा, योजनाबध्द हिंसा, सांस्कृतिक दहशतवाद, जैविक अस्त्र अथवा हल्ला, इत्यादी.

**प्रस्तावना:** दहशतवाद हा गुन्ह्याचाच एक प्रकार आहे. दहशतवाद समस्या ही प्रामुख्याने आधुनिक समाजाची समस्या होय. मागील शतकापासून आपला देश दहशतवादाच्या समस्येला सामोरे जात आहे. दहशतवाद हा भारतासारख्या विकसनशील देशाप्रमाणेच इंग्लंड, अमेरिकासारख्या प्रगत देशामध्येही निर्माण झाला आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणात गोंधळ व विस्कळीतपणा निर्माण करुन त्या राष्ट्राला दुर्बल बनविण्याची क्षमाता दहशतवादामध्ये आहे.

जॉन क्रेटम यांच्या मते, "समुदाय किंवा समुदायाच्या बहुतांश भागामध्ये राजकीय उद्दिष्टांपोटी भीती निर्माण करण्यासाठी केलेले हिंसात्मक गुन्हेगारी वर्तन म्हणजे दहशतवाद होय"[१]. 'एनसायक्लोपिडिया ऑफ सोशल सायन्सेस' मध्ये असे नमुद करण्यात आले की, "जेव्हा एखादा संघटीत समुह किंवा टोळी हिंसाचाराचा पध्दतशीर उपयोग करून आपली उद्दिष्ट साध्य करते तेव्हा त्या पध्दतीला दहशतवाद म्हणतात"[२].

बी.एम.जेनकिंस यांच्या मते, "केवळ दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने व्यक्तिगत हिंसाचार, हिंसाचाराची धमक किंवा हिंसाचाराची मोहीम, कृत्ये करणे म्हणजे दहशतवाद होय"[३]. संघटीत आणि योजनाबध्द हिंसाचाराच्या आधारे सामान्य शांतताप्रिय समाजाला वेठीस धरून आपली उद्दिष्टये साध्य करण्याचा प्रयत्न म्हणजे दहशतवाद असे म्हणता येईल. हे उद्दिष्ट बहूधा एखाद्या भूप्रदेशावर सत्ता मिळविणे असे असते किंवा तो उद्दिष्टाचा एक प्रमुख भाग असतो.[४] दहशतवादाचा उदय होण्यापाठीमागे काही धार्मिक, सैध्दांतिक प्रेरणा, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याद्वारे व्यापक उपलब्धी, जागतीक राजकारणात उघड युध्द करण्यावर आलेल्या मर्यादा अशी काही कारणे इतिहासातून विकसित होत गेली आहेत; त्यामुळे जगातील विविध देश या समस्येने पीडित आहेत. हे येथे दिलेल्या दहशतवादी संघटनांच्या यादीवरून सहज लक्षात येईल.

| अ. क्र | संघटना | देश |
|---|---|---|
| १. | अबु सैयफ ग्रुप | फिलिपिन्स |
| २. | अल्–गामा– अल् इस्लामिया (द इस्लामीक ग्रुप आयजी) | इजिप्त |
| ३. | आर्म्ड इस्लामीक ग्रुप | अल्जीरीया |
| ४. | टोम शिर्यिको | जपान |
| ५. | बास्क फादरलॅंड अॅंड लिबर्टी | स्पेन |
| ६. | चुकाकू हा (न्युक्लियस ऑफ मिडल कोअर फॅक्शन) | जपान |
| ७. | डेमोक्रॅटिक फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन | पॅलेस्टाईन |
| ८. | फतह रिव्होल्यूशनरी कौन्सिल (अबू निदान ग्रुप) | लेबॅनॉन |
| ९. | हमस | पॅलेस्टाईन |
| १०. | हरकत अल अन्सार | पाकिस्तान |
| ११. | हिजबल्लह (पार्टी ऑफ गॉड) | लेबॅनॉन |
| १२. | जमात उल फक्र | पाकिस्तान |
| १३. | जॅपनीज रेड आर्मी | जपान |
| १४. | जेहाद ग्रुप | इजिप्त |
| १५. | कच अॅन्ड कहाने चाई | इस्त्राईल |
| १६. | कुर्दीस्तान वर्कर्स पार्टी | तुर्कस्थान |
| १७. | लॉतोरो यूथ मूव्हमेंट | तुर्कस्थान |

ISSN : 2278-9308
March 2020

| | | |
|---|---|---|
| १८. | एलटीटीई | श्रीलंका |
| १९. | मॅन्युअल रॉड्रिकेझ पॅट्रिऑटिक फ्रंट | चिली |
| २०. | मोरन्झॅनिस्ट पॅट्रिऑटिक फ्रंट | होंडुरास |
| २१. | मोरन्झॅदीन–ए–खल्क ऑर्गनायझेशन | इराण |
| २२. | नॅशनल लिबरेशन आर्मी | कोलंबिया |
| २३. | नेस्टर पाझझामोरा कमिशन | बोलिव्हिया |
| २४. | न्यू पीपल्स आर्मी | फिलिपिन्स |
| २५. | पॅलेस्टाईन लिबरेशन फ्रंट | इराक |
| २६. | पार्टी ऑफ डेमोक्रॅटिक कांपुचिया | कंबोडिया |

| अ. क्र | संघटना | प्रदेश/राज्य |
|---|---|---|
| १ | जम्मू ॲंड काश्मीर लिबरेशन फ्रंट | जम्मू आणि काश्मीर |
| २ | हिज्ब–उल्–मुझाहिद्दीन | काश्मीर |
| ३ | नॅशनल कौंसिल ऑफ खलिस्तान | पंजाब |
| ४ | छल खालसा | |
| ५ | खलिस्तान कमांडो फोर्स | |
| ६ | बब्बर खालसा | |
| ७ | खलिस्तान लिबरेशन फोर्स | |
| ८ | शिख स्टूडन्टस् फेडरेशन (बिट्टू गट) | |
| ९ | ऑल इंडिया शिख स्टुडन्टस फेडरेशन | |
| १० | | पं. बंगाल |
| ११ | | महाराष्ट्र |
| १२ | | आंध्रप्रदेश |

| | | |
|---|---|---|
| १३ | नक्षलवादी | केरळ |
| १४ | | ओरिसा |
| १५ | | तमिळनाडू |
| १६ | | त्रिपुरा |
| १७ | अखिल आसाम विद्यार्थी संघटना (आसू) | |
| १८ | युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम | आसाम |
| १९ | बोडो पिपल्स ॲक्शन कमिटी | |
| २० | ऑल बोडो स्टुडंटस् युनियन | |
| २१ | बोडो लँड स्वायत्त परिषद | |
| २२ | मेघालय युनायटेड आर्मी | मेघालय |
| २३ | खासी फूर नॅशनल कौंसिल ऑफ मेघालय | मेघालय |
| २४ | नॅशनल सोशालिस्ट कौंसिल ऑफ नागालॅंड | नागालॅंड |
| २५ | ऑल नागा कम्यूनिस्ट पार्टी | नागालॅंड |
| २६ | मिझो नॅशनल फ्रंट | मिझोरम |
| २७ | त्रिपूरा सेना | त्रिपूरा |

**विविध देशाच्या व भारत देशातील दहशतवादी संघटना:**

भारतामध्ये १९५१ पासून दहशतवादास सुरूवात झाली. नागालॅंड, मिझोरम, मणिपूर, त्रिपुरा, गोरखालॅंड, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, आसाम इत्यादी राज्यामध्ये दहशतवादाची गंभीर समस्या झालेली आहे. दहशतवादाचा अभ्यास देश, विदेशातील अभ्यासकांनी विविधांगी संशोधनपर अध्ययन केले असले तरी, उपरोक्त विषयास अनुसरुन व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे. या अनुषंगाने उपर्यूक्त शिर्षकावरुन विवेचन पुढील उदिष्टांना अनुसरुन केले आहे.

१. 'दहशतवादाचा' समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करणे.
२. 'दहशतवाद' या संकल्पनेचा अभ्यास करणे.
३. 'दहशतवाद' आणि 'भारतीय समाज' यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
४. उत्तर आधूनिकतेत दहशतवादाचे महत्व जाणणे.
५. संकलीत माहितीचे विश्लेषण करणे.

संशोधनाची उदिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढिलप्रमाणे मांडलेली आहेत.

१. 'दहशतवादाची' जाणीव जागृती करणे एक काळाची गरज आहे.

२. भारतीय समाजामध्ये दहशतवाच्या संदर्भात नविन कायद्यांची सैध्दांतीक दृष्टिकोनाची गरज आहे.

३. कायद्यांची अमंलबजावणी वस्तूनिष्ठपणे करणे.

**शोधनिबंधाचे महत्व**: प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उदिष्ट दहशतवादाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करणे. उत्तर आधूनिकतेत दहशतवादाचे महत्व ओळखणे. एक मानवी प्राणी म्हणून प्रत्येकाला जीवन जगण्याचा हक्क आहे. भारतीय समाजजीवनाचा ऐतिहासिक अभ्यासाव्दारे दहशतवादाची पाळेमुळे शोधुन काढून त्यावर उपाय म्हणून कांही योजना आखली आहे काय? हे आपल्याला अभ्यासावरुन लक्षात येते. सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यासक, शासन यंत्रना व अभ्यासक इत्यादींना होऊ शेकल म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

**संशोधन पध्दती**:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोशन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने दुय्यम सामुग्री पध्दतीव्दारे 'दहशतवाद' ही संकल्पना नविन नसली तरी ती जुनीच आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

दहशतवाद हा धार्मिक, भाषिक, राजकीय, सांस्कृतिक दहशतवाद, जैविक दहशतवाद दिसून येतो. दहशतवाद ही सामाजिक समस्या असली तरी प्रस्तुत समस्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन महत्वाचा आहे. दहशतवादाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यासाठी जॉर्डन पॉस्ट[५] (श्रवतकंद चंनेज) या विचारवंताने खालील बाबीवर विशेष लक्ष दिले.

१) दहशतवादी म्हणून कोणत्या प्रकारचे लोक सहभागी झाले आहेत? आणि त्यांचे लक्ष्य कोण आहेत? त्यात बळी जाणारे कोणते लोक आहेत?

२) दहशतवादी लोकांची कोणती उद्दिष्टे आहेत? त्यांना नेमके काय हवे आहे?

३) दहशतवादी लोकांच्या प्रत्यक्ष आंतरक्रिया करतांना कोणती परिस्थिती आहे?

४) दहशतवादी कोण कोणत्या युध्द नीती, डावपेच म्हणजेच हत्या, अपहरण, चाचेगिरी, बॉम्बस्फोट, जाळपोळ, इत्यादींचा अवलंब करतात?

५) दहशतवाद निर्माण करणाऱ्या जवळ कोणत्या प्रकारची साधनसामुग्री आहे?

६) दहशतवादी कारवायांची फलनिष्पत्ती कोणती आहे? (सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, हत्या, रक्तपात, विनाश इत्यादी)

उपरोक्त गृहितकावरुन असे ठरवता येते की, दहशतवादी नव नविन तंत्रज्ञांनाचा वापर करुन दहशतवादी हल्ले करु शकतात. दहशतवादी गटांचा किती विविध अंगांनी अभ्यास करता येतो, हे समजून घेण्यासाठी 'डाईंग टू विन' – राबर्ट पेप[६] यांच्या पुस्तकाचा आधार घेतला पाहिजे. दहशतवादाचा अभ्यास पूर्वीपासून होत असला तरी अमेरिकेवरील हल्ल्यानंतर त्याला अधिक गती आली. ९/११ ते २६/११ या अंकाच्या तारखांना खूप महत्त्व आहे. कारण या दिवशी दोन्ही देशावर खूप मोठा दहशतवादी हल्ला झाला होता[७].

अमेरिकेच्या संसदेने नेमलेल्या एका तज्ञ गटाने[८] 'वर्ल्ड अॅट रिस्क' या शिर्षकाचा अहवाल सादर केला होता. त्या अहवालात जगातील दहशतवादी हालचालींचा मागोवा घेण्याबरोबर संभाव्य हल्ल्यांची मूळ केंद्रे कोठे असू शकतात. याचा उल्लेख केला आहे. जगाला

आणि विशेषतः अमेरिकेला असलेल्या संभाव्य दहशतवादी धोक्यांचा व संकटांचा अभ्यास वर्तवीला. अहवालाचा मुख्य निष्कर्ष चिंताजनक आहे. सन २०१३ च्या अखेरीस जगात कोठेतरी दहशतवादी हल्ल्यात सामूहिक संहारक अस्त्राचा (वेपन ऑफ मास डिस्ट्रक्शन) वापर केला जाईल आणि दहशतवादी बहुधा जैविक अस्त्राचा वापर करतील, असे अहवालाचे म्हणणे आहे.

**सारांश :**

दुर्दैव हे आहे की, आपण इतिहासातून खरोखरीच काही शिकत नाहीत. आणि म्हणून आपल्या देशातल्या अनेकांच्या मनात कितीतरी अनुत्तरीत प्रश्न आहेत. आपल्या देशात हे दहशतवादी हल्ले वारंवार का होत आहेत? त्यांच्या मागे 'परकीय शक्ती' चा हात आहे. असे आपले राज्यकर्ते म्हणतात. तेव्हा त्यांचा निर्देश पाकिस्तानकडे असतो का? तसे असेल, तर पाकिस्तान म्हणजे कोण? तिथले सरकार, तिथली आय.एस.आय. ही गुप्तचर संघटना, की तीथे तळ ठोकून असलेले लष्कर–ए–तैयबा सारखे दहशतवादी गट आणि दाऊद इब्राहिमसारख्या डॉन? त्यांचे परस्परांशी कांही संबंध आहेत का? असतील तर नेमके कसे आहेत? त्यांना पाकिस्तानच्याही बाहेरच्या कोण्या देशातून पाठबळ मिळते का? या सर्व बाबी आपल्या सरकारला माहित असतील, तर आपली यापूर्वीची सरकारे व आत्ताचे सरकार त्या बाबत इशारे देण्या पलीकडे काही करीत का नाही?

**संदर्भः**

१. अहूजा राम, (१९९२), *'सोशियल प्रॉब्लेम्स इन इंडिया'*, जयपूरः रावत पब्लीकेशन, पृ. ३४४.

२. फ्रीऑन होल्डरीन, (१९९७), *'द न्यू एनसायक्लोपेडीया ब्रीटानिका,'* शिकागोः व्हॉल्यूम ५, आवृत्ती १५, पृ. ३५७.

३. अहूजा राम, (१९९२), तत्रैव, पृ. ३४६,३४७.

४. रावत हरीकृष्णा, (२००४), *'अडव्हॉन्सड् एनसायक्लोपेडीया ऑफ सोशिओलॉजी'*, न्य देल्हीः रावत पब्लीकेशन, पृ. ५३०.

५. अलेझांडर वाय. आणि फ्रींगर एस. एम., (१९७७), *'टेररीझम; इंटरडिसीप्लीनरी पर्सपेक्टीव्ह'*, न्यूयार्कः जॉन जय प्रेस, पृ.

६. दिक्षित प्रशांत, (२००८), आत्मघातकी दहशतवादाची कारणमिमांसा, *सकाळ*:(सप्तरंग) रविवार, ७ डिसेंबर.

७. बागाईतकार अनंत, (२००८), दहशतवादाचा मार्ग पाकिस्तानातून जातो,*सकाळ*:(सप्तरंग) रविवार, १४ डिसेंबर.

८. गोहन हिरेन, (२००७), क्रोनिकल ऑफ व्हॉयोलन्स अॅन्ड टेररिझमः राइज ऑफ उल्फा',*इकॉनॉमिक अॅन्ड पॉलिटीकल वीक्ली*, व्हॉल्यूम–एक्स एल सेकंड, क्र. १२, ३०, पृ. ५८५९.(मार्च २४).

९. उपाध्यय अर्चना, (२००६), 'टेररीझम इन द नॉर्थ–इस्ट लींकेज अॅन्ड इंम्लीकेशन',*इकॉनॉमिक अॅन्ड पॉलीटीकल वीक्ली*, व्हॉल्यूम–एक्स एल वन, नं. ४८, ८, पृ. ४९९३.( डिसेंबर २).